**सं.फौ. ख. क्र. ३३६/२०१७**
**सविता वि. मदन**
**निशाणी क्रमांक – ३२ वर पुढे**

**<u>आरोपी तर्फे साक्षदार क्र. १ चा उलट तपास फिर्यादीतर्फे अधिवक्ता श्री पी.व्ही. बांते यांच्यातर्फे</u>**

४. माझे शिक्षण इयत्ता ८ वी पर्यत झालेले आहे. मी हिवराबाजार या गावात शिकलो आहे. मी हिवरा बाजार येथे मुळचा रहिवाशी आहे. हिवरा बाजार येथे माझी शेती आहे. माझी शेती वडीलोपार्जीत आहे. हिवरा बाजार येथे बॅक ऑफ इंडियाची शाखा आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर बॅक ऑफ इंडिया येथे मी दप्तरी या पदावर कर्मचारी होतो. हे म्हणणे खरे नाही की, सदर बॅक ऑफ इंडियाच्या शाखेमध्ये माझे दोन खाते होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यातील एका खात्याचा नं. ८७३८१११००००११६ व दुस–या खात्याचा नं.८७३८२६१००००२०१४ असे होते. साक्षीदार सांगतो की निवृत्त झाल्यानंतर खाते क्रमांक ८७३८२६१००००२०१४ बंद केला होता. सदर खाता हे ओव्हर डाफ्ट खाते होते म्हणून मी बंद केले होते. सदर खात्यासंबंधी मी चेकबुक घेतले होते. त्या चेकबुकचे मी वापर केलेला आहे.

५. मी दिनांक ३० सप्टेंबर २०१६ रोजी सेवानिवृत्त झालो होतो. हे म्हणणे खरे आहे की, हिवराबाजार गाव हे अदिवाशी क्षेत्रात आहे. हे म्हणणे खरे आहे की, हिवराबाजार येथील बरेचसे लोक अशिक्षीत आहेत. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे तेथील लोकांना बॅकेमध्ये फॉर्म वैगेरे भरता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी तेथे बॅकेत कामाला होतो म्हणून तेथील अशिक्षीत लोकांना बॅकेचे फॉर्म वैगेरे भरुन दयायचो. हे म्हणणे खरे आहे की, मीना, सविता व नंदा हया तीघी सालई गावातील रहिवाशी आहेत. सालई गाव हे हिवराबाजार येथून दोन किलोमिटर अंतरावर आहे. हे म्हणणे खरे आहे की, मीनाच्या खात्याप्रमाणे सविताचे खाते सुध्दा आमच्या बॅकेत होते. हे मला माहित नाही की, मीना, सविता व नंदा हया बचत गटाच्या सदस्य होत्या म्हणून तीन्ही सोबत आमच्या बॅकेत येत होत्या.

६. माझ्या शपथपत्रातील परिच्छेद क्रमांक २ मध्ये नंदा नेवारे, सविता नेवारे व मिनाबाई सोनकर हया एकाच गावी राहतात व त्या बचत गटाचे काम करतात, तसेच त्या

बचत गटामध्ये मीनाबाई सोनकर हया अध्यक्ष असून नंदा नेवारे व सविता नेवारे हया सुध्दा सदस्य आहेत हा लिहिलेला मजकूर खरा व बरोबर आहे. हे म्हणणे खरे आहे की, सविता नेवारे हिचा पती फॉरेस्ट खात्यात नोकरी करीत नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, सविता नेवारे हिचे पती रोजमजूरी करीत होते. हे म्हणणे खरे आहे की, सन २०१६ मध्ये अरुण चव्हाण हे हिवराबाजार येथे फॅारेस्ट खात्यात नोकरी करीत नव्हते. साक्षीदार सांगतो की ते त्यावेळेस फॉरेस्ट खात्यात नोकरीवर होते. हे म्हणणे खरे आहे की, अरुण चव्हाण हे हिवराबाजार येथे राहत नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे माझा अरुण चव्हाण याच्यासोबत कोणताही संबंध नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, अरुण चव्हाण यांचा आर्थीक व्यवहार माझ्या पत्नीसोबत होता. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पत्नीच्या नावाने जे घर होते त्याचा करारनामा माझ्या पत्नीने अरुण चव्हाण सोबत केला होता. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पत्नीने सदर करारनाम्याचा व्यवहार पूर्ण केला नाही म्हणून अरुण चव्हाण यांच्यावर खोटे आरोप लावून सदर शपथपत्र दाखल केलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, अरुण चव्हण याला १,००,०००/- ची परतफेड केली त्याबाबत कोणताही दस्तऐवज मी अभिलेखावर दाखल केलेला नाही.

७. हे म्हणणे खरे नाही की, माझे व माझ्या पत्नीचे सविता नेवारे हिच्या सोबत व तिच्या कुंटूबासोबत चांगले संबंध होते. हे म्हणणे खरे आहे की, मला घर बांधायाचे होते त्यावेळेस मला पैश्याची गरज होती. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळेस फिर्यादी हिने सुध्दा मला १,६०,०००/- रुपये दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी हिने मला पहिला ४०,०००/- त्यानंतर ६०,०००/- त्यानंतर ६०,०००/- असे उसनवार रक्कम दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, ती रक्कम मी सेवानिवृत्त झाल्यानंतर फिर्यादी हिला परत करणार होतो असे सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०५.०१.२०१७ रोजी मी फिर्यादीच्या गावी रक्कम परत देण्याकरीता गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी बॅक ऑफ इंडिया, हिवराबाजार शाखा धानादेश क्र.००३३५३ रुपये १,६०,०००/- हा फिर्यादीला दिला होता. हे मला माहिती नाही की, फिर्यादी हिने सदर धनादेश दिनांक ३०.०३.२०१७ रोजी बॅक ऑफ इंडिया हिवरा बाजार शाखा येथे वटविण्याकरीता दाखल केला होता. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या खात्यात पुरेशी रक्कम नसल्याने सदर धनादेश हा न वटता परत आला. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर फिर्यादीचे वकिल श्री मेश्राम यांनी त्याबाबत नोटीस पाठविली होती. हे म्हणणे खरे नाही की, सदर नोटीस मला दिनांक २५.०४.२०१७ रोजी मिळाली होती. आता साक्षीदाराला

नि.२७ वरील दस्त पोचपावती दाखविण्यात आले. हे म्हणणे खरे आहे की, त्यावर माझी सही आहे. हे म्हणणे खरे नाही  की, मी फिर्यादीला रक्कम परत केली नाही म्हणून फिर्यादीने माझ्या विरुध्द न्यायालयात केस दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या शपथपत्रात अरुण चव्हाण यांच्या संबंधी जे काही आरोप केलेले आहे ते खोटे केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी अरुण चव्हाण याला कोणत्याही प्रकारे पैसे परत दिले नाही. हे म्हणणे खरे आहे की, कोणताही व्यक्ती कोणालाही कोरा धनादेश सही करुन देत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी फिर्यादीकडून हातउसने रक्कम घेतली होती म्हणून तिला सही करुन धनादेश दिला होता. आता साक्षीदाराला धनादेश नि.२३ दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी फिर्यादी हिच्याकडून रक्कम घेतली असल्यामुळे तिला माझे कायदेशिर देणे आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या शपथत्रात जो काही मजकूर लिहिलेला आहे तो खोटा लिहिलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास नाही.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

रामटेक

दिनांक –०३/१२/२०२२.

**(श्रीमती. डी. एस. सैंदाणे)**

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,

रामटेक